# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४२७-२०२४ दिनांक - १३/११/२०२४

## प्रेस नोट

### “मोबाईलवर प्राप्त अनोळखी लिंकद्वारे फसवणुक झालेल्या तक्रारदार यांची ४,८२,०००/- रु परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश ”

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीत राहणा-या तक्रारदार नामे श्री. साळुंखे पाटील यांना त्यांचे मोबाईलवर अनोळखी लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी सदर लिंकवर क्लिक केल्याने तक्रारदार यांचे बँक खात्यातुन रक्कम कपात झाल्याबाबत मॅसेज प्राप्त झाला. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणुक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अर्जाची नोंद घेतली तसेच ऑनलाईन **NCCRP Portal ACK No. 21906240058010** अन्वये तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले. **अश्याप्रकारे सातत्यपुर्ण सायबर पोलीस ठाणे यांनी मा.न्यायालय तसेच बँकेकडे तक्रारदार यांची रक्कम मिळविण्याकरीता पाठपुरावा करुन फसवणुक झालेली ४,८२,०००/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करुन नये.
- क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.
- कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड करु नये. तसेच आपले मोबाईलमधील ॲप्लीकेशनची पडताळणी करावी.
- बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.
- आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.
- फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.
- कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ॲपमध्ये गुंतवणुक करु नये.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास

**तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचे सह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/सुवर्णा माळी, पोअं/विलास खाटीक, पोअं/ राहुल बन, मपोहवा/ माधुरी धिंडे सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000---**